**सोशल मिडीया साधनांचा वापर करून, धनाढ्य व्यक्तींशी संपर्क साधून, स्वतःच्या आर्थिक अडचणीचा पाढा वाचून त्यांची सहनाभुती मिळवून त्यांना प्रेमात पाडून खंडणी उकळणारी महिला तिचे प्रियकारसह अटक**

---

फिर्यादी हे व्यवसायाने कर सल्लागार असून त्यांना त्यांचे ओळखीचे मित्राकडून एका कॉल गर्ल मुलीचा नंबर मिळाला होता. त्यांनी तिच्याशी संपर्क केला व बोलेणे केले. त्यानंतर आरोपीत महिला व फिर्यादी यांचे व्हॉटसअॅपच्या माध्यामातुन संभाषण होवून लागले. संबधीत आरोपीत महिलेने ती कॉलगर्ल वगैरे नसल्याचे सांगून व ती एका चांगल्या घरातील असल्याचे सांगीतले. फिर्यादी व आरोपीत महिला यांची भेट स्वारगेट चौकात झाली तेंव्हा त्यांनी आपण कोण आहोत याबद्दल माहीती दिली. त्याआधारे संबधीत आरोपीत महिलेस फिर्यादी हे धनाढय असल्याचे लक्षात आल्यावर तिने त्यांची सहानुभुती मिळवण्याकरीता घरगुती अडचणी सांगून ती खुप मोठ्या आर्थिक संकटात आहे, तुंम्ही मला यातुन बाहेर काढा, मला पैशांची खुप गरज आहे. तुंम्ही मला मदत करा असे सांगतीले. त्यानंतर दोघांच्यात व्हॉटसअॅप चॅटींग वाढत गेल्या. रोज रात्री सुमारे पहाटे पर्यंत दोघांच्यात चॅटींग होत होत्या. त्यामध्ये आरोपीत महिला तिला पैशाची गरज असल्याचे सांगून पैशाची मागणी करत होती. तिने तिची वाई येथील ४० गुंठे जागेची प्रॉपर्टी आहे ती तुंम्हास गहाण ठेवते वगैरे सांगतीले. दोघेजण मिळून आरोपीत महिलेच्या गावी वाई येथे गेले व तेथील प्रॉपर्टी बघीतली. दोघांच्या मध्ये विश्वास निर्माण झाला व त्यातुन फिर्यादी यांनी सुरवातीस १,२०,०००/- रूपये तिचे अकाऊंन्टवर टाकले. व तुमचे पैसे हे मी माझी वाई येथील ४० गुंठे जागा विकून तुंम्हास तुमचे पैसे परत देईल असे आश्वासन दिले.

त्यानंतर वेळोवेळी आरोपीत महिलेने फिर्यादी यांना अडचणी सांगून पैसे मागीतले. व फिर्यादी यांनी ते तिला दिले. काही दिवसांनी, फिर्यादी दिलेल्या पैशाची परत मागणी सुरू केली तेंव्हा तिने फिर्यादी यांची भेट घेवून, तुंम्हास जी सुरवातीस माहीती मिळाली होती, ती बरोबर असून, मी तुमच्या बरोबर लोणावळा येथे येते, आपण दोघे तिकडे जावू, असे सांगीतले. तेंव्हा फिर्यादी व संबधीत महिला तेथे गेले, तेंव्हा आरोपीत महिलेने तिचा प्रियकर यास तेथे व्हॉटसअॅप लोकेशन शेअर करून बोलावून घेवून, फिर्यादी यांचे अंडरवेअर व बनियन वर आरोपीत महिलेसोबत फोटो काढले, तसेच दोघांनी मिळून फिर्यादी यांना बळजबरीने दारू पाजून त्यांना गाण्यावर नाच करण्यास भाग पाडले व तशी त्यांची व्हिडीओ शुटींग काढली. त्यानंतर नॉयलॉनचे दोरीने फिर्यादी यांचे हातपाय बांधले, व हातात चाकू घेऊन जिवे मारण्याची धमकी देऊन ७,५०,०००/- रुपये दे नाहीतर तुझ्या बायका पोरांना मी हे फोटो व क्लिप पाठवितो असे बोलून त्यांना त्यांचे मोबाईलवरून आरोपीत महिलेच्या अकाऊन्टवर पैसे ट्रान्सफर करण्यासाठी दबाव आणला व त्यावेळी फिर्यादी यांनी जाणीवपुर्वक चुकीचा पासवर्ड टाकून अकाऊंट ब्लॉक केले. त्यामुळे मोबाईलवरून पैसे ट्रांन्सफर झाले नाहीत. त्यामुळे आरोपीत महिला व तिचे प्रियकराने हॉटेलचे कॉम्प्यूटरवर वरून आरोपीत महिलेचे अकाऊंटवर पैसे ट्रान्सफर करण्याचा प्रयत्न केला परंतू फिर्यादीचे अकाऊंन्ट ब्लॉक असल्याने पैसे ट्रान्सफर झाले नाहीत.

दुसऱ्या दिवशी लोणावळा येथून निघून तिघेजण फिर्यादी यांचे शुक्रवार पेठ येथील ऑफीसमध्ये आले व तेथून ते ६०,०००/- रु आयडीबीआय बॅकेचा बेअरर चेक घेवून निंघून गेले त्यानंतर दि. १३/०६/२०१९ या तारखेचा ६,९०,०००/- रुपयेचा क्रॉस चेक आरोपती महिलेच्या नावाने घेतला. त्यापैकीं ६०,०००/- रुपये रक्कम त्यांनी काढून घेतली आहे. ६,९०,०००/- रुपयाचे चेकचे फिर्यादी यांनी पेमेन्ट स्टॉप केल्यामुळे तो चेक वटला नाही त्यामुळे दिनांक १७/०६/२०१९ रोजी आरोपीत महिला व तिचा

प्रियकर हे फिर्यादी यांच्या ऑफीस फिर्यादी यांना मारहाण करून त्याचे मोबाईल फोडून, ऑफीसचेही नुकसान केले आहे. सदर बाबत गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपीत महिला नामे दिपाली यशवंत गोळे वय २७ वर्षे रा.वंडरसिटी कात्रज पुणे. मुळगाव वाई जि.सातारा व तीचा प्रियकर विल्सन बाबू याकन्ना वय २५ वर्षे रा. स.नं.१२४/२८३ शिर्केनगर भिमनगर,पापड चाळ मुंढवा पुणे. यांना अटक करण्यात आली आहे.

.त्यांचेकडे केले तपासात आरोपीत महिला ही सोशल मिडीया साधनांचा वापर करून, धनाढ्य व्यक्तींशी संपर्क साधून, स्वतःच्या आर्थिक अडचणीचा पाढा वाचून त्यांचेकडून सहनाभुती मिळवून त्यांना प्रेमात पाडून त्यांचेकडून पैसे उकळत असल्याचे निष्पन्न होत आहे. तिच्या संपर्कात असलेल्या बऱ्याच लोकांना तिने अशा प्रकारे पैशाची मागणी केली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे अशा प्रकारचे आणखी गुन्हे दाखल होण्याची शक्यता आहे. दाखल गुन्ह्याचा अधिक तपास चालु आहे.

नागरीकांना याव्दारे असे आवाहन करण्यात येते की, वरिल नमूद महिला आरोपी व तिचा प्रियकर यांनी आशा प्रकारे कोणाची फसवणूक केली असल्यास त्यांनी खडक पोलीस स्टेशन अथवा गुन्हे शाखा युनिट-३, पुणे शहर यांचेशी संपर्क साधावा.

वरील कामगिरी गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त श्री. अशोक मोराळे, पोलीस उप-आयुक्त, श्री. शिरीष सरदेशपांडे, सहाय्यक पोलीस आयुक्त,गुन्हे-१, श्री. समीर शेख, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंन्द्र मोकाशी, पोलीस उप निरीक्षक श्री. किरण अडागळे, श्री. संजय गायकवाड, श्री.राजकुमार केंद्रे सहा.पो.उप निरीक्षक किशोर शिंदे, मेहबुब मोकाशी, दत्तात्रय गरूड, राहुल घाडगे, मच्छिंद्र वाळके, गजानन गाणबोटे, संदीप राठोड, अतुल साठे, सुजीत पवार व महिला कर्मचारी आरती कांबळे यांनी केली आहे.